# महाराष्ट्र वैद्यकियव आरोग्य सेवा गट-अ(वर्ग-२) संवर्गातील वैद्यकिय अधिकारी या पदावर कंत्राटी "तदर्थ वैद्यकिय अधिकारी" म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती वावत.

"जिल्हा निवड समिती, बीड".

(जाहिरात क्र.०२/२०२६ दि. 8-4-2026)

महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ वर्ग-२ संवर्गातील जिल्हा परिषद, बीड अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीकरीता किंवा नियमीत वैद्यकीय अधिकारी, बंधपत्रीत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत भरणेसाठी दिनांक 15.04.2026 रोजी Walk in interview (तोंडी मुलाखती) घेण्यांत येणार आहेत. त्या करीता इच्छुक एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रासह जिल्हा निवड समिती सदस्य सचिव, जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,बीड येथे दि. -------------- ते ---------------------- या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत व मुलाखतीस मुळ कागदपत्रासह हजर राहावे.

पदाचे नावः- तदर्थ (कंत्राटी) वैद्यकीय अधिकारी

अटी व शर्ती

१) उमेदवाराचे वय ५८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.
२) महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील कायम नोंदणी.

अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्र-

एमबीबीएस उत्तीर्ण सर्व वर्षाचे गुणपत्रक, एमबीबीएस पदवी, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील कायम नोंदणी प्रमाणपत्र, आंतरवासिता पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र,जन्म तारखेचा पुरावा, पासपोर्ट साईजचा फोटो, आधारकार्ड व ५०० रु बाँडवर सोबतच्या अटी शर्तीचे बंधपत्र व छायांकीत प्रत (साक्षांकीत).

निवड प्रक्रियाः-मुलाखतीव्दारे (Walk in interview)

मानधन-

| | |
|---|---|
| एम.बी.बी.एस. अर्हताधारक | रु.७५,०००/- |

सदर जाहिरात ही www.zpbeed.gov.in व www.beed.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून अर्ज करण्यासाठी सोबत अर्ज नमुना, अटी व शर्तीचा मसुदा जोडला आहे.

स्वा/-
सदस्य-सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,बीड

Digitally signed by Jithin Rahman
Date: 08-04-2026 17:24:23
सदस्य
जिल्हा निवड समिती, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,बीड

स्वा/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, तथा
जिल्हाधिकारी,बीड

महाराष्ट्र वैद्यकियव आरोग्य सेवा गट-अ(वर्ग-२) संवर्गातील वैद्यकिय अधिकारी या पदावर कंत्राटी "तदर्थ वैद्यकिय अधिकारी" म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती बाबत.

अर्जदाराचा विनंती अर्ज.

अर्जदाराचे संपुर्ण नाव :- ..............................................................................

अर्जदाराचा पत्ता :- ..............................................................................
..............................................................................

जन्म दिनांक :- ..............................................................................

महाविद्यालयाचे नाव ..............................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक ..............................................................................

ई-मेल आयडी ..............................................................................

आधारकार्ड क्रमांक ..............................................................................

आंतरवासिता पुर्ण केल्याचा दिनांक ..............................................................................

वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र (आहे/नाही, असल्यास नोंदणी क्र.व दिनांक)..............................................................................

महाराष्ट्राचा रहिवासी (आहे/नाही,असल्यास प्रमाणपत्र) ..............................................................................

शैक्षणीक अर्हता :-

| अ.क्र. | शाळा/महाविद्यालयाचे नाव | शैक्षणीक अर्हता | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | | एच. एस. सी. | | | | |
| ०२ | | एमबीबीएस प्रथम | | | | |
| ०३ | | एमबीबीएस द्वितीय | | | | |
| ०४ | | एमबीबीएस तृतीय | | | | |
| ०५ | | एमबीबीएस चतुर्थ/अंतिम | | | | |
| ०६ | | एकूण सरासरी (सर्व वर्षातील गुण) | | | | |

स्वाक्षरी-----------------

नाव-----------------

पत्ता-----------------

# अटी व शर्ती (५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर वंधपत्र)

१. तात्पुरती नियुक्ती दिलेल्या वैद्यकिय अधिका-यांना मासीक मानधन शा.नि.क्र.मवैअ-२०२०/ प्र.क्र. १५२ /सेवा-३ दि २९ मे २०२० नुसार रु.७५,०००/-(अक्षरी पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी एकत्रीत ठोक रक्कम सेवार्थ प्रणालीद्वारे आदा न करता त्यासाठी अहंरण व संवितरण अधिकारी हे वेगळयाने व्यवस्था करतील. तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांचे नाव सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ठ करण्यात येणार नाही.

२. सदर वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर एमबीबीएस अर्हताधारक नियमीत वैद्यकिय अधिकारी, बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईल त्यादिनांका पर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच असल्याने त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकरी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमीत वैद्यकिय अधिका-यांसारखे महाराष्ट्र नागरी सेवा निवृततीवेतन , महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम, नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

४. सदर तदर्थ नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्यापदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

५. केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमीत पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमीत सेवेस जोडून दिली जाणार नाही.

६. केवळ तात्पुरती व तदर्थ नियुक्ती दिलेल्या उमेदवरांची (निवृत्ती वेतन) महाराष्ट्र नागरी सेव नियम १९८२ मधील नुसार अर्हतकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा नियम ३०, सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

७. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. सदर तदर्थ वैद्यकिय अधिका-यांना महाराष्ट्र नगारी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील तरतुदी लागु होतील.

९. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१०. कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांची सेवा खालील कराणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येतील.
अ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर .ब) कामामध्ये निष्काळजीपणा. क) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.ड) मकाज अकार्याक्षम असणे / सेवेची कर्तव्ये व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास. इ) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे. ई) कार्यरत पदावर नियमीत वैद्यकिय अधिका-याची नियुक्ती झाल्यास.

११. निवड झालेले वैद्यकिय अधिका-यांनी मुख्यालयी रहाणे बंधनकारक असेल तसेच बायोमेट्रीक हजेरी प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

१२. तदर्थ वैद्यकिय अधिका-यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्या बाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यासाठी अंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही.

१३. या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्या बाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१४. नियमीत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकिय अधिका-यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकिय अधिकारी शेवटी रुजू झालेला आहे. त्याची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल.

१५. सदर ११ महिन्याची नियुक्ती ही आदेशाच्या दिनांकापासुन लागु राहील.

१६. उमेदवाराने नियुक्ती स्विकारुन दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर वरील अटी व शर्ती मान्य आहेत असे गृहीत धारण्यात येईल.

१७. वरील अटी व शती हया मी स्वखुशीने लिहून देत आहे. त्या मला मान्य आहेत.

स्वाक्षरी---------------------

डॉ.....................................

पत्ता---------------------